# सोलापुर महानगरपालिका, सोलापुर

"इंद्रभुवन"पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वेलाईन्स, सोलापुर – ४१३ ००१

मालमत्ता कर कार्यालय

जा..क्र.उपा./वै./माकअ/ ६५

दि.03/09/2025

## ई लिलाव प्रक्रियेचा तपशील

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या थकबाकीदारांच्या मिळकतींचा जाहिर ई लिलाव आयोजित केला असुन, त्याकामी जाहिर ई लिलाव प्रसिध्द करुन दि.04/09/2025 ते 10/09/2025 पर्यंत ई लिलाव दर मागविणेत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. 2025_MH_31170 | 2. 2025_MH_31171 | 3. 2025_MH_31172 |
| 4. 2025_MH_31173 | 5. 2025_MH_31174 | 6. 2025_MH_31175 |
| 7. 2025_MH_31176 | 8. 2025_MH_31177 | 9. 2025_MH_31178 |
| 10. 2025_MH_31179 | 11. 2025_MH_31180 | 12. 2025_MH_31181 |
| 13. 2025_MH_31182 | | |

| | |
|---|---|
| ई लिलाव प्रसिध्द वेबसाईट | www.eauction.gov.in |
| ई लिाव प्रसिध्दी दिनांक | दि.04/09/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता |
| ई लिलाव प्रवेश फी | र.रु. 500/- प्रति लिलावधारक |
| ई लिलाव प्रक्रियेत सहभाग घेणेची व 1 % बयाणा रक्कम भरणेची मुदत | दि.04/09/2025 ते 09/09/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| ई लिलाव धारकास पात्र-अपात्र ठरविणे | दि.10/09/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत |
| पात्र ई लिलाव धारकास बोली लावणेची मुदत | दि.11/09/2025 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| ई लिलाव प्रक्रियेत महत्तम बोली धारकाकडून बोलीच्या 20% रक्कम भरावयाचा दिनांक | दि.18/09/2025 अखेर कार्यालयीन वेळेत कर आकारणी कर संकलन कार्यालय, सो.म.पा. येथे भरणा करावी. |

(आशिष सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त (कर)
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.

मालमत्ता कर विभाग, इंद्रभुवन, प्रशासकीय इमारत

जा.क्र.उका/वै./६४ दि. 03/09/2025

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**

**मालमत्ता कर विभाग**

## -: जाहिर ई लिलाव सुचना :-

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील खालील नमूद मिळकतींची मालमत्ता कराची थकबाकी भरली नसलेने, अशा मिळकतदारांना या पूर्वीच नोटीसा बजावण्यात आलेले आहेत. परंतू खुल्या जागेच्या संदर्भात मिळकत कराची बिले भरणे व तसेच ज्या मिळकतदारांना कराची देयके प्राप्त झालेली नाहीत त्यांनी मालमत्ता कर विभागाकडे संपर्क साधून त्यांच्या देयकातील थकबाकीसह संपूर्ण कराची रक्कम भरणेबाबत वेळोवेळी जाहिर आवाहन करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ड प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये मिळकतदारांना यापुर्वी नोटीस देण्यात आलेली होती. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार नमुना 'आय' मध्ये 5 दिवसाच्या आत थकबाकी भरणेबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरप्रसिध्दीकरणाव्दारे दि.28/07/2025 अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी याबाबत खालील मिळकतधारकांनी थकबाकीही भरली नाही व कोणती हरकतही घेतली नाही. यास्तव खालील 15 मिळकतदांराची त्यांच्या नांवासमोर नमूद मिळकतीचा जाहीर ई-लिलावव्दारे विक्री करुन मिळकत कर वसुल करण्यात येत आहे. सदर ई लिलावाची सविस्तर माहिती www.eauction.gov.in या संकेत स्थळावर दि. /08/2025 पासून उपलब्ध् करुन देणेत येत आहे.

| अ. क्र. | मिळकत कमांक | मिळकतदाराचे नाव | मिळकतीचा पत्ता / सर्व्हे क्रमांक | मिळकतीचा प्रकार (खुली/ निवासी/ऑफीस/ दुकाने/औद्योगिक/ इतर) | कराची येणे रक्कम | खुले क्षेत्र (चौ.मि.) | बांधकाम क्षेत्र (चौ.मि.) | दर | मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 551783 | विकास पोपट सावंत | गट नं.64, केंगाव, सोलापूर | खुले क्षेत्र | 5,62,007/- | 11300 चौ.मि. | - | 880/- चौ.मि. | 99,44,000/- |
| 2 | 550372 | खंडू मच्छिंद्र पाटील | गट नं.50/1, प्लॉ.नं.295, केगांव गावठान | खुले क्षेत्र | 2,12,392/- | 7800 चौ.मि. | - | 1,790/- चौ.मि. | 1,39,62,000/- |
| 3 | 021210 | सिध्देश्वर इन्व्हेसमेंट प्रा.लि. | नगर भुमापन क्र.8612/ क,74, एस.एफ.राजहंस कॉम्प्लेक्स, गोल्ड फिंच पेठ,सोलापूर (दुसरा मजला) | इमारत दुसरा मजला | 17,11,219/- | - | 173.46 चौ.मि. | 50,660/- चौ.मि. | 87,87,484/- |
| 4 | 044520 | ज्योत्सना, मयुर आणि एश्वर्या विरभद्र बसवंती | टि.पी.न.04 फा.प्लॉ.नं.67 प्लॉट नं.01, बुधवार पेठ,सोलापूर | खुले क्षेत्र | 13,73,321/- | 5550 चौ.मि. | - | 9,100/- चौ.मि. | 5,05,05,000/- |
| 5 | 044524 | ज्योत्सना, मयुर आणि एश्वर्या विरभद्र बसवंती | टि.पी.न.04 फा.प्लॉ.नं.67 प्लॉट नं.06, बुधवार पेठ,सोलापूर | खुले क्षेत्र | 13,73,321/- | 5550 चौ.मि. | - | 9,100/- चौ.मि. | 5,05,05,000/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 043592 | प्रसाद गुरुनाथ नाफाडे | 167अ/एस-17, मेहता टॉवर, बुधवार पेठ | दुकान गाळा | 3,16,039/- | - | 31.41 चौ.फु. | 70,350/- चौ.मि. | 22,,09,694/- |
| 7 | 060867 | मनोहर नेमीचंद गुलेचा व इतर | नगर भुमापन क्र.2879, प्लॉ.क्र. 747, पश्चिम मंगळवार पेठ,सोलापूर (पहिला मजला) | सदनिका | 4,88,325/- | - | 29.52 चौ.मि. | 50,290/- चौ.मि. | 14,,84,561/- |
| 8 | 131780 | विजयकुमार विष्णूकुमार नारायण बडगंची | नगर भुमापन क्र.9664/472 घ.क्र.226, रविवार पेठ, सोलापूर | इमारती बिगर घरगुती | 7,14,581/- | - | व्यावसायिक 86.21 चौ.मि. | 64,310/- चौ.मि. 55,44,165/- | 1,50,86,095/- |
| | | | | घर | | - | घरगुती 93.53 चौ.मि. | 51,010/- चौ.मि. 47,70,965/- | |
| 9 | 131410 | सौ.पार्वतीबाई ब. लक्ष्मण वडर | नगर भुमापन क्र.9507/28 घ.क्र.65/12, रविवार पेठ,सोलापूर | जुने घर | 3,76,836/- | - | घर 23.79 चौ.मि. | 43,370/- चौ.मि. | 1031,773/- |
| 10 | 132306 | बापु शिवराम जाधव | टि.पी.स्कीम नं.01, 9/198, घ.क्र.267/198, रविवार पेठ,सोलापूर | जुने घर | 3,38,339/- | - | 121.93 चौ.मि. घरगुती | 43,370/- चौ.मि. | 52,88,104/- |
| 11 | 130259 | मुतय्या चंद्रय्या इराबत्ती | टि.पी.स्कीम नं.01, 9698/14/29, घ.क्र.14/29, रविवार पेठ,सोलापूर | बिगर घरगुती (कारखाना) | 4,44,047/- | - | 269.41 चौ.मि. | 58,930/- चौ.मि. | 1,58,76,331/- |
| 12 | 6110324 | शिवा कन्स्ट्रक्शन अॅन्ड डेव्ह.पार्टनर शिवानंद खंडप्पा चिनगुंडे व इ. | स.नं.95/1अ/2अ/1, मजरेवाडी, जुळे सोलापूर | खुले क्षेत्र | 7,31,002/- | 4000.00 चौ.मि. | - | 4,350/- चौ.मि. | 1,74,00,000/- |
| 13 | 568884 | मंगल भिमाशंकर तडवळकर | सि.स.न.357/2अ, सोरेगांव, सोलापूर | खुले क्षेत्र | 5,38,471/- | 115.97 चौ.मि. | - | 3680/- चौ.मि. | 4,26,770/- |

ई-लिलावामध्ये सहभागी होण्याकरीता शर्ती अटी :-

1. उक्त् मिळकतीबाबत इतर आस्थापनांच्या काही हरकती / दावा / बोजा / गहानखत इत्यादी असल्यास याबाबत प्रसिध्दीकरणापासून 45 दिवसाच्या आत या कार्यालयाकडे सादर कराव्यात.

2. मालमताधारकाने लिलावाच्या दिनांकापर्यंत व्याजासह संपूर्ण थकबाकी रक्कम जमा केल्यास लिलावाच्या यादीतून त्याचे नाव वगळता येईल,

3. लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या व्यक्तीस नोटीसीमधील ज्या ज्या मालमत्तांकरिता बोली लावायची असेल त्या प्रत्येक मालमत्तेकरीता स्वतंत्रपणे मालमत्तेच्या मल्यांकन रकमेच्या 1% बयाणा रक्कम महापालिकेने दिलेल्या मुदतीत जमा जमा करणे अनिवार्य राहील., अशा जमा रकमेची पावती दाखवल्याखेरीज लिलावाचे प्रसंगी त्यात भाग घेता येणार नाही.

4. लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक व्यक्तीकडून 20% रक्कम वसुल करण्यात आल्यानंतर महत्तम बोली कायम करणेकरीता आयुक्तांची मंजुरी घेऊन उर्वरीत 80% टक्के रक्कम वसूल करण्यात आल्यानंतरच Sale Certificate नोंदणीकृत करून घेणेकरीता नोंदणीचा खर्च संबंधित महत्तम बोलीधारकांकडून जमा करून घेऊन नोंदणीकृत Sale Certificate (विक्री दाखला) देण्यात येईल. तद्नंतर इतर बोलीधारकांची 1% बयाणा रक्कम परत करण्यात येईल.
5. विक्रीची जाहीर सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून 45 दिवसांची मुदत संपेपर्यंत थकबाकीधारकाला कोणत्याही स्थावर मालमत्तेची विक्री करता येणार नाही. मात्र तदनंतर विक्री करण्यापूर्वी महानगरपालिकेची जप्ती असल्याने लेखी पूर्व परवानगी घ्यावी लागेल.
6. कसूरदाराने किंवा त्यांच्यावतीने कोणी दुसऱ्या व्यक्तीने थकबाकीची रक्कम जाहीर सूचनेतील मालमत्तेची विक्री करण्याच्या वेळेपूर्वी केव्हाही अदा केल्यास वा कर संकलन विभागाकडील पैसे भरलेची पावती / प्रमाणपत्र सादर केल्यास सदर मालमत्तेची विक्री तहकूब केली जाईल.
7. आधारभूत किमतीची बोली आली नसल्यास विक्री नाकरण्यात येईल व फेरविक्री संबंधी नवीन जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येईल,
8. कोणतीही बोली नाकारण्याचा अथवा लिलावाची प्रक्रिया रद्द करणेचा अधिकार लिलाव समिती प्रमुख तथा आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना राहिल,
9. स्थावर मालमता विक्री काढण्याचा जाहीर सूचना काढल्यानंतर जर कसुरदाराने किंवा इतर मालमत्ता गहाणवट टाकून भाड्याने देऊन किंवा अशा मालमतेची किंवा त्यातील काही भागाची विक्री करून किंवा इतर मालमत्तेची विक्री करून पैसा उभा करणार असल्याबद्दल आयुक्तांची खात्री पटवून दिली तशा प्रकारे लेखी अर्ज दिल्यास त्याची पडताळणी करून आयुक्त कसूरदाराला पैसे उभे करण्यासाठी अशा मालमत्तेची विक्री काही कालावधी करता स्थगित ठेवू शकतील, यासाठी अटी शर्ती विहीत करण्यास आयुक्त सक्षम असतील.
10.मालमत्ता विक्रीच्या वेळी ज्या खरेदीदाराची बोली स्विकारली जाईल त्याने खरेदीच्या किंमतीपैकी 20 टक्के रोख रक्कम लिलाव करणाऱ्या अधिका-याकडे तात्काळ भरली पाहीजे अन्यथा ही मालमत्ता ताबडतोब परत विक्रीसाठी काढण्यात येऊन तिची विक्री केली जाईल आणि पूर्वीच्या खरेदीदारास पुन्हा लिलावात भाग घेता येणार नाही.
11. रक्कम भरणेची 20 दिवसांची मुदत संपल्यानंतर 7 दिवसांचे आत अथवा 7 वा दिवस साप्ताहिक सुट्टीचा असेल तर त्या नंतरच्या लगतच्या कामाच्या दिवशी खरेदीदारास खरेदीची उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या कार्यालयात भरावी लागेल.
12. विहित कालावधीमध्ये खरेदीची उर्वरीत रक्कम जमा करण्यास खरेदीदाराने कसूर केल्यास त्याने लिलावाचे वेळी जमा केलेल्या अनामत 20% टक्के रकमेतून विक्रीसाठी झालेला खर्च वसुल करण्यात येईल, आणि उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या निधीत जमा करण्यात येईल. त्यानंतर सदर मालमत्तेची पुनर्विकी करण्यात येईल. कसुरदार असलेल्या खरेदीदाराला मालमत्ते वर अथवा मालमत्तेची विक्री करुन मिळालेल्या रकमेच्या कोणत्याही भागावर हक्क राहणार नाही.
13. सदर लिलाव प्रक्रियेमध्ये स्थावर मालमत्ता विक्री केली जाईल त्या दिवसानंतर 20 दिवसांचे आत सदर मालमत्तेचा मालक अथवा सदर मिळकतीच्या विक्रीपूर्वी सदर मालमत्ते मध्ये कोणतेही हितसंबंध असलेली व्यक्ती सदर विक्री रद्दबातल ठरविण्यासाठी अर्ज करू शकेल मात्र त्यापूर्वी संपूर्ण रक्कम महानगरपालिकेच्या कार्यालयात जमा करावी लागेल.
14. लिवावाच्या जाहिरनाम्यात उल्लेख नसलेल्या वर्षाची वा व्याजाची रकम देण्याची जबाबदारी कसूरदारावरच राहील.
15.लिलावाच्या तारखेनंतर २० दिवसाचे आत कोणतीही व्यक्ती स्वतःच्या हितसंबंधास अशा विक्रीमुळे बाधा पोहचली आहे वा लिलावाच्या प्रसिद्धीमध्ये अथवा लिलावाने विक्री करण्यामध्ये फसवणूक अनियमितपणा अथवा चूक केली वा झाली आहे. या कारणास्तव रद्दबातल ठरविण्यासाठी अर्ज करू शकेल. मात्र अशा फसवणुकीमुळे, अनियमितपणा मुळे अथवा चुकीमुळे अर्जदाराच्या हितास कशाप्रकारे बाधा पोहचत आहे त्यामुळे त्याचे काय नुकसान होत आहे याबद्दल अर्जदाराने आयुक्तांची खात्री पटवून देणे आवश्यक राहील.
16. जप्त केलेली मालमत्ता मनपाची येणे रक्कम वसूल केलेनंतर लिलावामध्ये खरेदी केलेल्या व्यक्तीस मालकी हक्काचे दस्त करुन देणेबाबतची संपूर्ण कार्यवाही, भूमि आणि मालमत्ता विभागामार्फत करणेत येईल.
17. लिलावामध्ये खरेदी केलेल्या मालमत्तेच्या संबंधात मुद्रांक शुल्क नोंदणी शुल्क इत्यादी सर्व खर्च खरेदीदारास करावे लागतील.
18. लिलाव प्रक्रियेमध्ये मालमत्तेची विक्री परिपूर्ण कायम करण्यात आलेली असेल तेव्हा अशी मालमत्ता, तिची विक्री झाल्यापासून खरेदीदाराच्या मालकीची झाल्याचे समजण्यात येईल, मूळ मालकाचे व त्याचे वारसाचे तसेच गहाणकार इत्यादीचे सर्व हक्क् संपुष्टात येतील.
19. जेव्हा लिलाव व विक्री पूर्ण होईल तेव्हा अशा विक्रीपासुन मिळालेल्या रकमेतून प्रथम विक्रीसाठी झालेली खर्चाची रकम व त्यानंतर थकबाकीची रकम वळती केली जाईल. उर्वरीत रकम शिल्लक असल्यास विक्रीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत आयुक्तांकडे लेखी अर्ज करून तिच्यावर हक्क् सांगण्यात आला तर, अटकावून ठेवण्याच्या किंवा जप्त करण्याच्या वेळी अशी मालमत्ता ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीस ती रक्कम परत करण्यात येईल. सहा

महिन्यांच्या आत हक्क् न सांगितलेली कोणतीही शिल्लक रक्कम महापालिकेच्या कोषागारात कायम स्वरुपी जमा केली जाईल व अशी रक्कम तदनंतर परत केली जाणार नाही. तथापि विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे राहतील.

20. सदर लिलाव प्रक्रियेदरम्यान लिलाव प्रक्रियेच्या शर्ती, अटीचे निकष / तरतूदीमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा / दुरुस्ती / नवीन निकष समाविष्ट करणेचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना राहतील.

(टिप:- उक्त् मिळकतीची प्रत्यक्ष पहाणी करणेकरीता सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00 या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा )

Sd/-
(आशिष सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका